मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या
तरतुदीखाली नेमण्यांत आलेल्या प्रशासकाना
मेहनताना देणेबाबत...

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
शासन निर्णय, क्र. ग्रापप्र१०९०/प्र. क्र. १६८५/२१-अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : २८ मे १९९२.

वाचा : १] शासन निर्णय, सहकार व ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएम११६३/५६००८/पी, दि. ३ जून १९६४

२] शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीएस१२६५/६११९४/ई, दि. १७ डिसेंबर १९६५

३] शासन निर्णय, व्हीपीएम२६८२/२६३७/सीआर१७१९/२१ दि. १५ ऑक्टोबर १९८२.

शासन निर्णय :- संदर्भाधीन क्रमांक [२] व [३] अन्वये अनुक्रमे दि. १ मे, १९६२ नंतर व दि. १ ऑक्टोबर १९८३ पासून ग्रामपंचायतीचे प्रशासक म्हणून नेमण्यांत आलेल्या अधिकाऱ्यांना मेहनताना देण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले होते.

२. आता दि. १ जानेवारी १९८६ पासून वेतनमानांत सुधारणा झाल्याने शासन असे आदेश देत आहेत कि, दि. १ ऑक्टोबर १९८८ पासून स्वत:चे काम सांभाळून, एका ग्रामपंचायतीचा प्रशासक म्हणून, अतिरिक्त कार्यभार पाहण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनाच्या ५% मेहनताना व स्वत:चे काम सांभाळून एकापेक्षा जास्त ग्रामपंचायतींचा प्रशासक म्हणून अतिरिक्त कार्यभार पाहण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या मूळवेतनाच्या १०% मेहनताना मंजूर करण्यांत यावा.

. हा निर्णय वित्त विभागाच्या संमतीने व त्यांच्याकडील अनौपचारिक संदर्भ क्र. ८१२१/प्र. क्र. ४१९/९२/व्यय-१५, दि. २१ मे १९९२ नुसार निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[गो. ना. कुलकर्णी]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

जिल्हाधिकारी
रत्नागिरी.
JUN 1992
शाखा-
प्र. कि. नि. प्रति, जिल्हाधिकारी

0090